C18

# महाराष्ट्र शासन

क्र.नाहप्र- ४०१९/प्र.क्र.११९/१९/एसएम-३
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार इमारत, मंत्रालय, मुंबई ३२
दिनांक : २२ जुलै, २०१९.

प्रति,
सचिव,
महाराष्ट्र ॲकेडमी ऑफ इंजिनियरिंग ॲन्ड एजयुकेशन रिसर्च,
सर्वे नं.१२३/१२४, पौड रोड, कोथरुड,
पुणे-४११०३८.

विषय :- सी.बी.एस.ई. अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्याकरीता देण्यात आलेल्या ना-हरकत प्रमाणपत्राबाबत ...

संदर्भ :- शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र क्रमांक नाहप्र-४०१९/प्र.क्र.११९/एसएम-३, दिनांक २२/०७/२०१९

महोदय,

महाराष्ट्र अॅकेडमी ऑफ इंजिनिअरींग अँड एज्युकेशन रिसर्च, कोथरुड, पुणे संचलित माईर्स विश्वशांती गुरुकुल स्कुल, आळंदी, गट नं.१४९/१५०, हनुमान वाडी, केळगांव, ता.खेड, जि.पुणे या शाळेस इयत्ता १ ते १० वी करीता सी.बी.एस.ई (C.B.S.E) अभ्यासक्रमाशी संलग्नित होण्याकरीता संदर्भ क्रमांक (१) अन्वये ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले आहे. उक्त ना-हरकत प्रमाणपत्र खालील कागदपत्रांची पूर्तता करण्याच्या अटीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

- शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प., पुणे यांच्या बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम २०११ यांच्या नियम ११, पोटनियम (४ ) अंतर्गत शाळेस देण्यात आलेले नमुना-२ प्रमाणपत्राची वैधता दिनांक ३१ मार्च, २०१९ रोजी संपलेली असून संस्थेने शाळेत उपलब्ध भौतिक सुविधांबाबत तपशीलवार माहितीसह अद्ययावत नमुना-२ प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

तरी संस्थेने १ महिन्याच्या कालावधीत सदर अटीची पूर्तता करणे आवश्यक आहे. अन्यथा सदर ना-हरकत प्रमाणपत्र रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आपली,

(स्वा.म.नानल)
उप सचिव, महाराष्ट्र शासन